# कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक लि.

**मुख्यालय — १७८/२ब, रविवार पेठ,**

छ. शिवाजी महाराज सर्कल, पोवई नाका, सातारा.

सीआरडीएनएसएसबी/एल—१/**३३१**/२०२१—२२ दि. ३० जुलै २०२१

— महत्वाचे परिपत्रक —

प्रति,

वरिष्ठ शाखाप्रमुख / शाखाप्रमुख,
कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक लि.
सर्व शाखा

**विषय** — कर्जावरील व्याजदर बदलाबाबत .....
**संदर्भ** — सीआरडीएनएसएसबी/एल—१/१८३/२०२०—२१ दि. ३० जून २०२०

१. वरील विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून, मा. संचालक मंडळ सभा दि. १४/०७/२०२१ ठराव क्र. १३/२८ अन्वये आपल्या बँकेचे कर्जावरील व्याजदर बदल करणेबाबत विचारविनिमय होऊन दि. ०१ ऑगस्ट २०२१ पासून आपल्या बँकेच्या कर्जावरील व्याजदर खालीलप्रमाणे लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

अ. हजर सैनिकांसाठी —

a) स्थावर तारणी कर्जे —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| i) घरबांधणी /फ्लॅट खरेदी | १०.००% | ९.५०% |
| ii) व्यक्तीजामीन तारणी /प्लॉट खरेदी कर्ज | ११.००% | १०.५०% |
| iii) शेतीपुरक / शेतीसुधारणा, जमीन खरेदी इ. कर्ज | १०.५०% | १०.००% |
| iv) वाहन कर्ज | १०.००% | ९.५०% |

aa) हजर सैनिकांसाठी — सदर कर्ज हप्ता रकमेचे ACH Mandate व धनादेश त्यांचे पगार खात्यावरीलच (Salary Account) घेणे आवश्यक आहे.

ab) हजर सैनिकांसाठी रू. १५.०० लाख पर्यंत कर्ज मंजुरीचे अधिकार मुख्यालयामध्ये मा. चेअरमनसो, मा. महाव्यवस्थापकसो व कर्ज विभागप्रमुख यांचे समितीस राहतील. यापैकी रू. १०.०० लाख पर्यंतची अधिकतम कर्ज मर्यादा व्यक्तीजामीन कर्ज मंजुरीची राहील.

ac) हजर सैनिकांसाठी शाखाप्रमुखांचे अधिकारात कर्ज मंजुरी व वितरणाचे अधिकार खालिलप्रमाणे—

i) ऑफीसर्ससाठी घरबांधणी, घर खरेदी, घर दुरूस्ती, प्लॉट / फ्लॅट खरेदी व जमीन खरेदीसाठी रू. ७.०० लाख कर्ज मंजुरी व वितरणाचे अधिकार राहतील.

ii) ऑफीसर्ससाठी व्यक्तीगत रू. ५.०० लाख कर्ज मंजुरी व वितरणाचे अधिकार राहतील.

iii) जेसीओज व ऑदर रँकसाठी व्यक्तीगत रू. ३.०० लाख कर्ज मंजुरी व वितरणाचे अधिकार राहतील.

**b)** विनातारणी कर्ज –

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| i) व्यक्तीजामीन विनातारणी कर्ज (हजर सैनिकांसाठी) | १२.००% | ११.००% |

**ba)** हजर सैनिकांसाठी – व्यक्तीजामीन विनातारणी कर्जाची मर्यादा ही जास्तीत जास्त रक्कम रू. २.०० लाख एवढी राहील. (व्यक्तीजामीन तारणी व विनातारणी कर्ज मर्यादा ही जास्तीत जास्त रू. १०.०० लाख एवढी राहील.) उदा. व्यक्तीजामीन तारणी कर्ज रू. ८.०० लाख अधिक व्यक्तीजामीन विनातारणी कर्ज रू. २.०० लाख असे एकुण रू. १०.०० लाख एवढी राहील.

**bb)** सदर कर्जाची मुदत जास्तीत जास्त ५ वर्षे राहील

**bc)** सदरहु कर्ज मंजुरीचे अधिकार वरिष्ठ शाखाप्रमुख / शाखाप्रमुख यांना राहतील व सदरचे अधिकार सहाय्यक शाखाप्रमुख यांना राहणार नाहीत. (पुर्वी एखादे कर्ज खाते चालु असेल तर हे अधिकार मा. शाखाविकास समिती / कर्ज समिती यांना राहील.)

**bd)** कर्जदार / सहकर्जदार व जामीनदार यांचे स्थावर मिळकतीचे उतारे घेण्यात यावेत. कर्ज मंजुरीची सर्व प्रक्रिया इतर कर्जाप्रमाणेच राहील.

**be)** सदर कर्ज हप्ता रकमेचे **ACH Mandate** व धनादेश त्यांचे पगार खात्यावरीलच **(Salary Account)** घेण आवश्यक आहे.

ब. कॅशक्रेडीट कर्ज –

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| i) स्टॉक / डेटर्स व कोलेटरल तारणासहीत | १२.००% | ११.५०% |
| ii) स्थावर तारण कॅश क्रेडीट करिता | १२.५०% | १२.००% |

**aa)** कॅश क्रेडीट कर्ज खात्यांसाठी स्टॉक स्टेटमेंट दरमहा येणे आवश्यक आहे.

**ab)** दरमहा स्टॉक स्टेटमेंट न येणा–या कॅश क्रेडीट कर्ज खात्यांवर व्यवहार होणार नाहीत.

**ac)** दरमहा स्टॉक डेटर्स सिस्टिम मध्ये भरणा करून त्यानुसार डीपी मेंटेन करण्यात यावी.

**ad)** तसेच कॅश क्रेडीट खात्यांवर कर्ज मंजूर रकमेच्या ८०% पेक्षा कमी रक्कम एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक काळ कमी उचल राहील्यास न उचल केलेल्या रकमेवर २% दंड आकारण्यात येईल.

**ae)** कॅश क्रेडीट कर्जासाठीची मुदत १२ महीने राहील. सदर कॅश क्रेडीट कर्ज मंजुरी नंतर नुतनीकरणासाठी मार्च अखेरच्या तिमाही मध्ये येणार नाही, अशा पध्दतीने कर्जाची मुदत देणेत यावी.

क.   वाहन कर्ज –

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| | मुदत महिने जास्तीत जास्त ६० महिने | मुदत महिने जास्तीत जास्त ६० महिने |
| i) व्यवसायिक (Commercial) वाहन | १२.००% | ११.००% |
| ii) व्यवसायिक (Commercial) जुने (तीन वर्षाच्या आतील ) वाहन | १२.५०% | ११.५०% |
| iii) कार खरेदी | १०.००% | ९.५०% |
| ii) कार खरेदी जुनी (तीन वर्षाच्या आतील ) | १०.५०% | १०.००% |
| iv)दुचाकी वाहन | १०.००% | ९.५०% |

aa) वाहन कर्जासाठी दुय्यम स्थावर तारण (Collateral Security) घेण्याची आवश्यकता नाही. मात्र कर्जदार व जामिनदार यांचे स्थावर मिळकतीचे सर्व उतारे दप्तरी घेणे आवश्यक आहे. जर अर्जदार यांचे नावे अशी स्थावर मिळकतीचे उतारे नसतील अशा वेळी स्थावर मिळकत नावे असलेला सहकर्जदार घेवून सदरहु अर्ज विचारार्थ स्विकारण्यात यावा. तसेच इतर उत्पन्नाचीही कागदपत्रे दप्तरी घेणे आवश्यक आहेत.

ab) कमर्शिअल वाहन कर्जाचे बाबतीत संबंधित कर्जदार यांची पूर्वीच्या व्यवहारांची पडताळणी करता / आपल्या बँकेकडुन प्रथमच कर्ज मागणी करीत असलेले कर्जदार यांचे दुय्यम स्थावर तारणांविषयीचे सर्व अधिकार संबंधित शाखा विकास समितीस राहतील.

ab) मुख्यालयामध्ये उपमहाव्यवस्थापक व कर्ज विभागप्रमुख यांचे समितीस रू. २.०० लाखापर्यंत दुचाकी वाहन कर्ज मंजुरीचे अधिकार राहतील. अधिक माहीतीसाठी मुख्यालय परिपत्रक क्र. सीआरडीएनएसएसबी/एल–१/७८९/२०१९–२० दि. १०/१२/२०१९ चे अवलोकन व्हावे.

ड. पगारतारण पगारदार नोकरांकरीता पगार कपात हमीपत्रावर (Salary Undertaking) कर्ज –

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| i) पगारतारण (पगारदार नोकरांकरीता पगार कपात हमीपत्रावर (Salary Undertaking) कर्ज | १३.००% | १२.००% |

aa) पगार हमीपत्र घेवुन दिलेल्या पगार तारण कर्जास सरसकट १२% इतका व्याजदर आकारण्यात यावा. मात्र विविध संस्थांसाठी (उदा. कंपनी इ.) सवलत दिलेली कर्जे यामधुन वगळण्यात यावीत.

ab) शाखाप्रमुखांचे अधिकारामध्ये शासकीय / निमशासकीय कर्मचा–यांना रू. ५.०० लाख पर्यंत कर्ज वितरणाचे अधिकार राहतील.

ac) शाखाप्रमुखांना विविध कंपन्यांच्या कर्मचारी / अधिका–यांना दिलेल्या वेळोवेळीच्या कर्ज वितरणाच्या अधिकारानुसार कर्ज मंजुरीचे अधिकार राहतील.

ad) ज्या कंपन्यांच्या / संस्थांच्या कर्मचारी / अधिकारी यांना कर्जे वितरीत करीत आहोत त्या विविध कंपन्यांच्या / संस्थांच्या कर्मचारी / अधिकारी व्यतिरिक्त नव्याने इतर विविध कंपनी / संस्थांचे कर्मचारी / अधिकारी यांचेकडुन कर्जमागणी आलेस त्यांचे बाबतीत सर्व कागदपत्रांची माहिती, भेट अहवाल व आपल्या शिफारशीसह मा. संचालक मंडळ सभेस पाठविणे आवश्यक राहील. त्यानंतरच या कंपन्यांच्या / संस्थांच्या कर्मचारी / अधिकारी यांना कर्ज वितरणांबाबत आदेश होतील. त्यानंतरच आपणास या प्रकारांतर्गत देणेत येणा—या अधिकारानुसार कर्ज मंजुरीचे अधिकार राहतील.

ae) सदर कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांची स्थावर मिळकत (Asset Details) ची संपूर्ण माहिती घेणेत यावी. या बाबतचा तपशिल कर्ज मंजुरी तक्त्यामध्ये ठेवणेत यावा.

af) कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांचा कायमचा पत्ता पत्रव्यवहाराचा / सध्या राहत असलेला पत्ता इ. संबंधिची माहिती दप्तरी ठेवणेत यावी. या बाबतचा तपशिल कर्ज मंजुरी तक्त्यामध्ये ठेवणेत यावा.

ag) सदर कर्जाची मुदत जास्तीत जास्त ७ वर्षे राहील.

इ. घरबांधणी कर्ज —

| कर्जप्रकार | कमाल मुदत वर्षे | कमाल कर्ज मर्यादा | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|---|---|
| i) घरबांधणी स्थावर तारण कर्ज (इतर सर्व ग्राहकांकरीता) | १५ | ७०.०० | १०.००% | ९.५०% |
| ii) घरदुरूस्ती स्थावर तारण कर्ज (इंटेरिअर / कंपौड) शहरी / गग्रमीण | ५ | १०.०० / ६.०० | ११.००% | ११.००% |

बँकेने पूर्वी घरबांधणीसाठी दिलेल्या कर्जाचे तारण मिळकतीमध्ये बदल / फेरफार / दुरूस्ती आणि वाढीव बांधकाम इ. साठी कर्जाची मागणी झालेस कर्जदाराची परतफेड क्षमता पहावी. अशा कर्जदारास वरील कमाल कर्ज मर्यादेचे बंधन लागू राहील.

ई. मुदत कर्ज (व्यापार व्यवसाय कर्ज) —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| i) MSME कर्जे (आधार उद्योग नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक) | ११.५०% | ११.५०% |
| ii) व्यवसायासाठी दुकान गाळा, ऑफीस गाळा, मशिनरी इ. खरेदी साठी अथवा खेळत्या भांडवलासाठी | १२.००% | ११.५०% |

उ. बिल्डर्सना (प्रोजेक्ट लोन) देणेत येणारी कर्जे —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| बिल्डर्सना (प्रोजेक्ट लोन) देणेत येणारी कर्जे | १४.००% | १४.००% |

ऊ. गृहपयोगी / घरगुती उपकरण कर्ज —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| गृहपयोगी वस्तु — संगणक, टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, फर्निचर इ. खरेदी | १२.००% | १२.००% |

ए. ठेवतारण कर्ज —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| ठेवतारण कर्ज | ठेवीवरील व्याजदरापेक्षा २% जास्त | ठेवीवरील व्याजदरापेक्षा २% जास्त |

ऐ. इतर सर्व तारणी कर्जे —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| सैनिकांव्यतिरिक्त सर्व ग्रहकांसाठी शेती सुधारणा, शेतीपुरक, जमीन खरेदी व व्यक्ती जामीन इ. कर्ज | ११.००% | १०.५०% |

ख. सोनेतारण कर्ज (बुलेट पेमेंट) —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| बुलेट पेमेंट २.०० लाख पर्यंत मार्जीन २५% | | |
| i) महिला कर्जदारांसाठी | १०.००% | ९.५०% |
| ii) पुरूष कर्जदारांसाठी | १०.००% | ९.५०% |

ग. सोनेतारण कर्ज (मुदत कर्ज) —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| मुदत कर्ज ३.०० लाख पर्यंत मार्जीन २५% | | |
| i) महिला कर्जदारांसाठी | १०.००% | ९.५०% |
| ii) पुरूष कर्जदारांसाठी | १०.००% | ९.५०% |

घ. **Overdraft Against Gold** कर्ज —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| Overdraft Against Gold कर्ज, मार्जीन २५% | १०.५०% | ९.५०% |

aa) सोनेतारण मुदत कर्जाची मुदत ही जास्तीत जास्त ३५ महीने राहील.

ab) Overdraft Against Gold कर्जयोजने अंतर्गत उंब्रज शाखेसाठी रू. ३.०० लाख व सातारा व येरवडा शाखेसाठी रू. ५.०० लाख मर्यादा, पुरूष व महिला ग्राहकांसाठी ९.५०% कर्ज

व्याजदर राहील. या अंतर्गत सातारा, उंब्रज व येरवडा शाखा वगळून इतर शाखांकडुन या प्रकारच्या कर्जाची मागणी झालेस मुख्यालयाचे पुर्व परवानगीने अशी कर्जे शाखा स्विकारू शकतात.

ac) Overdraft Against Gold कर्जयोजने अंतर्गत वितरीत केलेले खाते दर ३ वर्षांनी नुतणीकरण करण्यात यावे परंतु, सदरहु खात्यांचा दरवर्षी **Review** घेण्यात यावा. तसेच शाखेतील सोने जिन्नस Super Valuation करतेवेळी या प्रकारच्या खात्यांचे देखील Super Valuation करावे.

(**टिप** — सोनेतारण कर्जाच्या अधिक माहितीसाठी व कार्यपध्दतीसाठी मुख्यालय परिपत्रक क्र. सीआरडीएनएसएसबी/एल–१/१०६/२०१६–१६ दि. १३ मे २०१५ चे अवलोकन करावे)

**ad)** रू. १.०० लाख व त्यावरील करण्यात येणारे सोनेतारण कर्जासाठी कर्जदारास १०'ब' सभासद करून घेवूनच कर्ज वितरण करावे. या बाबतचे मुख्यालय परिपत्रक सीआरडीएनएसएसबी/प्रशा–१/१३३२/२०१५–१५ दि. २३ जानेवारी २०१५ चे अवलोकन करावे.) संबंधित ग्राहकाकडे पुर्वीचे 'अ' वर्ग / १०'ब' सभासदत्व असल्यास नवीन सभासद होण्याची आवश्यकता नाही.

**ae)** रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार सोने खरेदीसाठी कर्ज देण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तसेच सोन्याचे बिस्कीट, नाणी इ. तारण घेवून सोनेतारण कर्ज आदा करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**af)** Overdraft Against Gold कर्जयोजने अंतर्गत दिलेल्या कर्जास मुख्यालयाकडून वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या सोनेतारण उचल मर्यादेनुसार सदर कर्जाची उचल मर्यादा ठरविणेत यावी व त्यानुसारच वेळोवेळी उचल मर्यादा नियंत्रणात आहे का ते पहावे.

च. शैक्षणिक तारणी कर्ज —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| शैक्षणिक तारणी कर्ज | १०.५०% | १०.००% |

छ. प्रोफेशनल व्यावसायीक तारणी कर्ज —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| डॉक्टर, चार्टर्ड, अकाऊंटन्टंस, कंपनी सेक्रेटरीज, मॅनेजमेंट कन्सलटंट्स | १०.५०% | १०.००% |

ण. व्यक्तीजामीन कर्ज सभासदांकरीता —

**a)** स्थावर तारणी कर्जे —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| व्यक्तीजामीन कर्ज सभांसदांकरीता | ११.००% | १०.५०% |

**aa)** बँकेच्या 'अ' वर्ग सभासदांसाठी व्यक्तीजामीन तारणी कर्जाची कमाल मर्यादा रू. ५.०० लाख एवढी राहील. या कर्जासाठी असणारे कर्जाचे इतर सर्व नियम व अटी लागू राहतील.

**ab)** सदर खातेदारांचे पेन्शन खात्यावरील ACH Mandate व धनादेश घेणे आवश्यक आहे.

**b)** विनातारणी कर्जे —

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| व्यक्तीजामीन विनातारणी कर्ज सभासदांकरीता | १२.००% | ११.००% |

**aa)** माजी सैनिक हे बँकेचे 'अ' वर्ग सभासद असावेत. तसेच सदरहु कर्जाची कमाल मर्यादा रू. १.०० लाख एवढी राहील.

**ab)** सदर कर्जाची मुदत जास्तीत जास्त ५ वर्षे राहील.

**ac)** सदरहु कर्ज मंजुरीचे अधिकार वरिष्ठ शाखाप्रमुख / शाखाप्रमुख यांनाच राहतील व सदरचे अधिकार सहाय्यक शाखाप्रमुख यांना राहणार नाहीत.

**ad)** कर्जदार / सहकर्जदार व जामिनदार यांचे स्थावर मिळकतीचे उतारे घेण्यात यावेत. कर्ज मुजुरीची सर्व प्रक्रिया इतर कर्जाप्रमाणेच राहील.

**ae)** कर्जदार खातेदारांचे पेन्शन खात्यावरील **ACH Mandate** व धनादेश घेणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांच्या **Pension Passbook** ची फोटोकॉपी घेण्यात यावी.

**af)** कर्ज वितरण करतेवेळी कर्जदार खातेदारांचे कमाल वय ६५ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**न. ग्रामस्वच्छता योजनेअंतर्गत सैनिक सभासदांना स्वच्छता गृहबांधणेसाठी —**

| कर्जप्रकार | सद्याचे व्याजदर | नवीन व्याजदर |
|---|---|---|
| ग्रामस्वच्छता योजनेअंतर्गत सैनिक सभासदांना स्वच्छता गृहबांधणेसाठी रू. १००००/— कर्ज | १०.००% | ९.००% |

कर्जदार 'अ' वर्ग सभासद असणे आवश्यक आहे. कर्जाची मुदत ३ वर्षे राहील. कर्जास जमीन तारण देणे आवश्यक आहे. तसेच शौचालय बांधण्यात येणा—या जागेचा उतारा दप्तरी ठेवणेत यावा. कर्जास शेती उत्पन्न असलेले किंवा पगारदार दोन जामीनदार घेणे आवश्यक आहे. या योजने अंतर्गत स्वच्छता गृह बांधले / बांधणार असले बाबतचा ग्रामसेवकाचा दाखला घेणे आवश्यक आहे.

३. वरील व्याजदर दि. १ ऑगस्ट २०२१ पासुन वितरीत करण्यात येणा—या सर्व कर्जाना लागू करण्यात यावेत. यापुर्वी मंजुर झालेले तथापी आदा न केलेल्या कर्जास सदरचे सुधारित व्याजदर लागू राहतील. यापुर्वीच्या वितरीत केलेल्या सर्व कर्जाना पुर्वीचाच व्याजदर कायम राहील.

४. **घरबांधणी अगर घरदुरूस्ती कर्जे ही असेसमेंट उता—यावर दिली जावू नयेत.** ग्रामपंचायत हददीतील बांधकामासाठीचा बांधकाम परवाना योग्य त्या अधिकृत अधिका—याकडून घेवूनच कर्ज अर्ज स्वीकारावेत.

५. कंपनी व संस्थांचे कर्मचा—यांना विशेष सवलतीच्या दराने दिलेल्या कर्जाचे व्याजदर हे त्या त्या ठरावीक परिपत्रकान्वये लागू राहतील.

६. दरमहा ठरवुन दिलेला हप्ता वेळेत व नियमित भरणा—या कर्जदारांना वर्षाखेरीस १% सुट **(Rebate)** लागू राहणार नाही याची नोंद घ्यावी.

७. थकरकमेवर २% जादा व्याज आकारण्यात यावे.

८. शाखा विकास समितीस रू. २०.०० लाख पर्यंत कर्ज मंजुरीचे अधिकार राहतील. शाखा विकास समितीच्या शिफारशीने रू. २०.०० लाखांवरील रकमेच्या कर्ज मंजुरीसाठीची कर्जे मुख्यालय कर्ज समितीस पाठविण्यात यावीत.

९. या व्यतिरीक्त मुख्यालय कर्ज समितीस रू. २०.०० लाखावरील रकमेच्या कर्ज मंजुरीचे सर्व अधिकार राहतील.

१०. शाखा विकास समिती सभेपुढे रू. ३.०० लाख व त्यावरील नवीन व नुतनीकरण करण्यात येणारे कर्जाचे बाबतीत कर्ज मंजुरीसाठी कर्जदार यांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११. मुख्यालय कर्ज समितीसमोर रू. २०.०० लाखावरील नवीन व नुतनीकरण करण्यात येणा—या कर्जाचे बाबतीत कर्ज मंजुरीसाठी कर्जदार यांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१२. कॅशक्रेडीट कर्जदाराने कॅशक्रेडीट कर्ज खात्यांचे मुदतीमध्ये उचल केलेल्या मंजुर मर्यादेच्या ५ पट पेक्षा अधिक व्यवहारांची उलाढाल केली असल्यास सदर कर्जदार यांना कर्ज नुतनीकरणासाठीच्या मुलाखतीसाठी उपस्थित न राहण्याची मुभा असेल मात्र आपणांस कर्जदार यांचेशी इतर मुद्‌यावर चर्चा करणे अपेक्षित असल्यास तसे अगोदर कर्ज विभागप्रमुख यांना कळविणेत यावे.

१३. सर्व कर्जाचे बाबतीत कर्ज फाईलमध्ये छाननी अहवाल, भेट अहवाल व लोन स्क्रुटीनी अहवाल विहीत नमुन्यात पूर्ण अभ्यास करून सहीनिशी टंकलिखीत सादर करावा. अधिक माहीतीसाठी मुख्यालय परिपत्रक क्र. सीआरडीएनएसएसबी/प्रशा—१/८६५/२०१९—२० दि. २३ जानेवारी २०२० चे अवलोकन करावे.

१४. रू. १.०० लाख व त्यावरील सर्व कर्ज मागणी अर्जदार यांचा **CIBIL** रिपोर्ट घेण्यात यावा व त्याचा स्कोर व अनुषंगिक माहिती आपल्या भेट अहवालात व चार्ट मध्ये नमुद करण्यात यावी. आवश्यक त्या ठिकाणी सर्च रिपोर्ट व व्हॅयुएशन घेणेत यावा. तदनंदतरच प्रकरण आपल्या अधिकारात वितरीत करावे व त्याचबरोबर कर्ज समिती सभेसमोर सादर करणे आवश्यक आहे.

१५. कर्ज वितरणानंतर संबंधित कर्जासाठीचा वापर इ. साठी प्रत्यक्ष भेट देण्यात यावी व तसा अहवाल दप्तरी ठेवणेत यावा.

१६. सर्व कर्जे **CAMS Module** मधुनच वितरीत करण्यात यावीत.

१७. वर नमुद संदर्भीय मुख्यालय परिपत्रक क्र. सीआरडीएनएसएसबी/एल—१/१८३/२०२०—२१ दि. ३० जून २०२० रद्द् समजण्यात यावे.

१८. वरीलप्रमाणे कमी करण्यात आलेल्या विविध प्रकारातील कर्ज व्याजदरांचा कर्ज वाढीसाठी उपयोग करावा. तसेच बँकेचे अग्रक्रम क्षेत्र कर्ज वितरण लक्ष गाठण्यासाठी व व्यक्तीजामीन कर्ज पोर्टफोलीओ विभागणीसाठी कमी करण्यात आलेल्या व्याजदराचा उपयोग करून घेण्यात यावा. त्याचबरोबर सर्व सेवकांनी त्यांची वैयक्तिक उदिष्टे पर्यायाने शाखेची व बँकेची कर्ज उदिष्टे प्राप्त करण्यासाठी खुप मोठया प्रमाणात प्रयत्न करावेत.

१९. वरील कर्ज अटी / नियमांमध्ये बदल करण्याचा तसेच वर नमुद व्याजदरापेक्षा कमी व्याजदर आकारण्याचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील.

२०. सर्व सेवकांचे सहीनिशी सदर परिपत्रकाची पोच दप्तरी ठेवण्यात यावी.

कर्ज वृध्दीसाठी आमच्या हार्दिक शुभेच्छा !

Sd/-
(वाय. ए. देसाई)
मुख्य कार्यकारी अधिकारी